# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** वाशी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0007 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**16/01/2024 23:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 16/01/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/01/2024
**Time From (वेळेपासून):** 10:53 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:12 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/01/2024 **Time (वेळ):** 22:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 038

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/01/2024 22:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वाशी,वाशी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पांडुरंग आप्पाराव हाके

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामकुंड ,ता भुम,वाशी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामकुंड ,ता भुम,वाशी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तानाजी त्रिबंक तांबे | | | 1. रा वाशी ,वाशी,उस्मानाबाद, महाराष्ट्र,भारत |
| 2 | रणजित अनिल कासारे | | | 1. रा वाशी,वाशी,वाशी, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 3 | पवन राजेंद्र हिंगमिरे | | | 1. रा झिन्नर ता वाशी,वाशी, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

वेळत दाखल

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रूपये दराच्या 04 चलनी नोटा असे एकूण 2000 | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पांडुरंग आप्पाराव हाके, वय 39 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. रामकुंड ता. भुम जि. धाराशिव मोबाईल नंबर 8208940791

मी आज दिनांक 16.01.2024 रोजी पोलीस ठाणे वाशी येथे श्री. नानासाहेब कदम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांचे समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन शेती हा व्यवसाय करुन उपजिवीका भागवीतो.

आमचे गावाचे बीटला असलेले पोलीस श्री. तांबे यांनी मला दिनांक 13.01.2024 रोजी पोलीस ठाणे वाशी येथे बोलावले होते. त्यावरुन मी वाशी येथे आलो असता श्री. तांबे पोलीस यांनी मला सांगितले की, तुमच्या विरुध्द तुमच्या बायकोने मारहाण केले बाबत दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे वाशी येथे एन.सी. दाखल आहे. सदर एन. सी.मध्ये तुझ्या विरुध्द मी बीट अंमलदार यांना किरकोळ कारवाई करण्यास सांगितले होते. त्यावरुन बीट अंमलदार यांनी मी सांगितल्यामुळे तुझ्यावर 107 प्रमाणे तहसिलदार यांचेकडे प्लेन चॅप्टर रिपोर्ट पाठविला आहे.त्या बदल्यात आणि मी तुझ्या बायकोला सदरची तक्रार मिटवुन घेण्यास सांगतो व पुन्हा तक्रारी करुन त्रास देवु नको असे समजावुन सांगण्यासाठी प्रथम 5000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती 2000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यामुळे मी दिनांक 14.01.2024 रोजी श्री. म्हेत्रे साहेब, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांना फोन वरुन सदरची तक्रार सांगितली. मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 15.01.2024 रोजी पो.नि. कदम हे पंच व सापळा पथकासह कन्हेरी जाणारे रोडवर, कन्हेरी फाटा जवळ ता. वाशी येथे सुरक्षीत ठिकाणी आले. तेथे मी पोनि कदम साहेब यांचेकडे माझी सविस्तर लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 15.01.2024 रोजी श्री. कदम साहेब, पोलीस निरीक्षक, यांनी पोलीस श्री. तांबे साहेब हे माझ्याकडे माझे विरुध्द दाखल असलेल्या एन.सी. मध्ये बीट अमंलदार यांना सांगुन किरकोळ कारवाई केली त्याबदल्यात व माझ्या बायकोला समजावुन सांगतो म्हणुन व पुन्हा तक्रार करु नको असे समजावुन सांगण्याच्या कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत पोलीस ठाणे वाशी येथे मी व पंच क्र.01 तिर्थकर यांना पाठवुन लाचमागणी पडताळणी करणार असल्याचे कळविले. त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी लाच मागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली.आणि मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री. कदम साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन व्हाईस रेकॉर्डचे प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर श्री. कदम साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ आचार्य यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाच्या आतमध्ये बणीयनला पीनच्या सहाय्याने अडकविले आणि सापळा पथक थांबलेले ठिकाणावरुन पंच क्रमांक 1 तिर्थकर यांना माझे सोबत पाठवुन लोकसेवक श्री. तांबे पोलीस यांची पारा चौक वाशी येथे भेट घेण्यासाठी माझे मोटारसायकल वरुन रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 हे माझे मोटार सायकलवरुन लोकसेवक श्री. तांबे पोलीस यांची पारा चौक वाशी येथे भेट घेण्यासाठी गेलो असता तेथे लोकसेवक श्री. तांबे हे दिसले नाहीत म्हणुन मी माझे मोबाईल वरुन श्री. तांबे पोलीस यांना फोन केला असता श्री. तांबे पोलीस यांनी मी बाहेर आहे कासारे साहेबाला पाठवुन देतो असे म्हणाले. त्यानंतर थोडा वेळात पोलीस कासारे साहेब आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. तेव्हा कासारे यांनी तांबेला फोन केलता का असे विचारल्यावर मी केलता असे म्हणालो. त्यावेळी काही नाही तेच्या करीता म्हणलं तिकडं जा म्हणुन असे म्हणाले त्यावर मी किती म्हणाले होत असे विचारले असता श्री कासारे यांनी दोन असे म्हणाले तेव्हा मी त्यांना दोन हजार होय असे म्हणालो असता त्यांनी हं. असे म्हणाले. त्यावेळी मी अर्धा तासानंतर



Scanned with CamScanner

देतो असे म्हणाल्यवर कासारे साहेब यांनी तांबे साहेबांना फोन करण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येवुन घडलेली हकीकत पंच क्रं 02 यांचे समक्ष पो.नि. कदम यांना सांगितली. त्यानंतर पो.नि.कदम यांनी माझेत व लोकसेवक श्री. तांबे व कासारे पोलीस यांचेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषन ऐकले. एकंदरीत लाचमागणी पडताळणी दरम्यान माझे विरुध्द दाखल असलेल्या एन.सी.मध्ये बीट अमंलदार यांना प्लेन चॅप्टर रिपोर्ट पाठविण्यासाठी सांगितल्याचे व माझे बायकोला तक्रार मिटवुन घेण्यासाठी व पुन्हा तक्रार करु नको असे समजावुन सांगण्याचे कामासाठी श्री. तांबे पोलीस यांनी श्री. कासारे साहेब यांचे मार्फतीने माझ्याकडे 2000/- रुपये लाचेची मागणी केली. व कासारे पोलीस यांनी तांबे पोलीस यांचे सांगणेवरुन माझ्याकडे 2000/- रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोनि कदम यांचे सुचनेवरुन मी तांबे पोलीस यांना फोन करुन कोठे भेट होईल असे विचारले असता तांबे पोलीस यांनी मी उदया येणार आहे उदया बोलु आपण असे सांगितले. त्यावरुन दिनांक 15.01.2024 रोजीची लाच मागणी पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर आज दिनांक 16.01.2024 रोजी पोनि कदम यांनी मला फोन करुन कन्हेरी जाणारे रोडवर, कन्हेरी फाटा जवळ ता. वाशी येथे सुरक्षीत ठिकाणी येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी 10.00 वा. सुमारास आलो असता पोनि कदम हे सापळा पथकासह सदर ठिकाणी हजर होते. त्यावेळी पोनि कदम यांनी मला तांबे पोलीस यांची भेट कोठे होईल असे विचारले असता त्यांना मी तांबे पोलीस यांना फोन करुन विचारतो असे म्हणुन तांबे पोलीस यांना त्यांचे मोबाईल वर फोन केला. त्यावेळी तांबे यांनी फोन उचलला नाही. काही वेळाने माझे मोबाईवर तांबे पोलीस यांचा फोन आला. त्यावेळी त्यांनी मला वाशी मध्ये आल्यानंतर फोन करण्यास सांगितले. त्यानंतर पोनि कदम यांनी पंच व माझ्याशी चर्चाकरुन तांबे पोलीस यांची समक्ष भेट घेवुन लाचमागणी पडताळणी करुन सापळा कारवाई करण्यात येणार आहे असे कळविले. त्यानंतर मला व पंच क्रं 01 तिर्थकर यांना श्री. कदम साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ आचार्य यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाच्या आतमध्ये बणीयनला पीनच्या सहाय्याने अडकविले आणि सापळा पथक थांबलेले ठिकानावरुन वाशी येथे रवाना केले. मी व पंच असे वाशी येथे आलो व तांबे पोलीस यांना फोन केला असता त्यांनी मला युनिक कलेक्शन येथे जावुन पवन या व्यक्तीस भेटुन फोन करण्यास सांगितले. त्यावरुन मी व पंच क्रं. 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. व पोनि कदम साहेब यांना पंच क्रं 02 यांचे समक्ष घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि कदम साहेब यांना मी तांबे पोलीस हे माझी समक्ष भेट घेणार नाहीत. त्यामुळे तांबे पोलीस यांनी कासारे यांचे मार्फत मागणी केलेली लाचेची रक्कम बाबत सापळा कारवाई करावी असे सांगितले.

त्यावरुन पो.नि. कदम यांनी पंच व माझेशी चर्चा करुन लोकसेवक तांबे पोलीस यांनी कासारे पोलीस यांचे मार्फतीने मागणी केले प्रमाणे युनिक कलेक्शन वाशी येथील पवन या व्यक्तीची भेट घेण्यास पाठवुन लाचेच्या सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि कदम साहेब यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे मला व पंचाला सांगितले.त्यानंतर पोनि कदम यांचे सुचनेवरुन पोशि तावसकर यांनी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्प बाबत मला व पंचाना माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. पो.नि. कदम यांनी नियोजित कारवाईचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईसाठी लागणारी आवश्यक रोख रक्कम 2,000/-रु. पो.नि. कदम यांचेकडे हजर केले. पो.नि. कदम यांचे सुचने नुसार पोशि तावसकर यांनी 2,000/-रु. ज्यामध्ये 500/-रु दराच्या 04 नोटाचे नंबर व वर्णन पंच क्रमांक 2 वाघे यांचे करवी नमुद करुन घेतले. त्यानंतर पोशि तावसकर यांनी कापसाच्या बोळ्याने लाचेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे अंगावरील पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. पोनि कदम यांनी मला लोकसेवक तांबे पोलीस यांनी लाच स्विकारल्यास किंवा त्यांनी इतर व्यक्तीकडे देण्यास सांगितल्यास सदर व्यक्तीने लाच रक्कम स्विकारल्यास माझे गळ्यातील पांढरा गमजा डाव्या हातात घेण्याचा इशारा नेमुन दिला. व सापळा पुर्व कार्यवाही केली.

त्यानंतर पो.नि. कदम यांचे सुचनेवरुन पोकॉ / आचार्य यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन एका छोटया कापडी पिशवीत ठेवुन माझे शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन बनियानचे आतमध्ये सुरक्षीत ठेवुन मला व पंच क्र.01 यांना लोकसेवक तांबे पोलीस यांनी सांगितलेले युनिक कलेक्शन वाशी येथे पवन या व्यक्तीची भेट घेण्यासाठी रवाना केले व पो.नि. कदम हे सापळा पथकासह आमचे पाठोपाठ आले.मी व पंच क्रमांक 1 माझे मोटार सायकलवरुन युनिक कलेक्शन वाशी येथे गेलो. तेथे पवन यांची भेट घेवुन तांबे साहेब पोलीस यांनी भेट घेण्यास सांगितले आहे असे पवन यास म्हणालो तेव्हा पवन याने तांबे पोलीस यांना फोन करण्यास सांगितले.त्यावरुन मी माझे मोबाईलवरुन तांबे पोलीस यांना फोन केला. तेव्हा त्यांनी पवन यांचेकडे पैसे देण्यास सांगितले.त्यानंतर पवन व लोकसेवक तांबे यांचे फोनवरुन बोलणे झाल्यानंतर मी पवन यास तांबे पोलीस यांनी तुमच्याकडे पैसे देण्यास सांगितले आहेत असे म्हणुन मी लाच रक्कम माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशातून उजव्या हाताने काढुन पवन यास देण्यासाठी



Scanned with CamScanner

त्यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दुकानातील काउन्टरवर ठेवली. त्यानंतर मी युनिक कलेक्शन दुकानातुन बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अश्या प्रकारे माझे गळ्यातील पांढरा गमजा डाव्या हातात घेवुन लाच स्विकृतीचा इशारा केला. ती वेळ साधारण 12.12 वा.सुमारास होती. त्यानंतर तात्काळ पो.नि.कदम साहेब, सापळा पथक व पंच क्र. 02 असे युनिक कलेक्शन येथे आले. त्यावेळी पोकॉ/ आचार्य यांनी माझे कडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केले. तेथे कदम साहेब यांनी पंच क्रमांक 1 तिर्थकर यांना तक्रारदार यांचेकडे कोणी लाच मागुन स्विकारली याबाबत विचारणा केली. त्यावेळी पंच क्रमांक 01 तिर्थकर यांनी युनिक कलेक्शन येथील एका व्यक्तीकडे हाताने इशारा करुन सांगितले की, लोकसेवक तांबे पोलीस यांनी सांगितलेले पवन हेच असुन त्यांनीच माझे समक्ष लोकसेवक तांबे पोलीस यांचे सांगणेवरुन लोकसेवक कासारे पोलीस यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली 2,000/- रुपये लाचेची रक्कम पवन यांनी स्वत: उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे दुकानातील काउन्टरवर ठेवली आहे असा खुलासा केला.

त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी पवन यांना स्वत:चा परिचय करुन दिला व त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव पवन राजेंद्र हिंगमिरे, वय 26 वर्ष, व्यवसाय युनिक कलेक्शन वाशी रा. झिन्नर ता. वाशी जि. धाराशिव असे सांगितले. त्यावेळी पवन हिंगमिरे यांनी तांबे पोलीस यांचे सांगणेवरुन 2000/- रुपये स्विकारल्याचे सांगितले. त्यानंतर कदम साहेब यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार तावसकर यांनी पवन हिंगमिरे यांचे दोन्ही हात धरुन ठेवले व पोकॉ आचार्य यांनी कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हॉईलेट लॅम्पच्या प्रकाशात चेक केले. त्यानंतर पो.नि.कदम यांनी पवन हिंगमिरे यांना लाचेची रक्कम कोठे आहे असे विचारले असता, पवन हिंगमिरे यांनी त्याचे दुकानातील काउन्टरवर ठेवलेली लाच रक्कम पंचासमक्ष दिली. सदरच्या रक्कमेच्या चलनी नोटांची पंचाकरवी पडताळणी केली असता त्या नोटांचे नंबर पंच क्रमांक 02 यांचेकडील सापळा कारवाई वेळी लिहुन ठेवलेल्या नंबरशी तंतोतंत जुळून आले. त्यानंतर तेथे पुढील योग्य ती कारवाई करण्यात आली. त्यानंतर पवन हिंगमिरे यांना ताब्यात घेवुन खाजगी वाहणाने वाशी परिसरात पोलीस तांबे यांचा शोध घेतला काही वेळाने तांबे पोलीस यांना लक्ष्मी अलंकार जवळ शिवाजी नगर वाशी येथुन ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव तानाजी त्रिबंक तांबे, वय 28 वर्ष, पोकॉ/ 260 नेमणुक पोलीस ठाणे वाशी मुळ रा. जेकटेवाडी ता. परंडा सध्या रा वाशी असे सांगितले. त्यानंतर पोनि कदम साहेब यांनी तांबे पोलीस यांना कासारे पोलीस यांचे बाबत विचारपुस करुन श्री कासारे यांना वाशी डार्स चे पाठिमागुन ताब्यात घेतले. तेथे त्यांना पोनि कदम साहेब यांनी नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रणजित अनिल कासारे, वय 31 वर्ष, पोकॉ/ 514 नेमणुक पोलीस ठाणे वाशी रा. चिचंपुर (बु) ता. परंडा सध्या रा. वाशी असे सागितले. सदरची कारवाई चालु असताना पोनि कदम यांनी फोन करुन त्यांचे कार्यायातील शासकीय वाहन बोलावल्याने त्याठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथील शासकीय वाहन व अंमलदार हे मदतीकरीता आलेले होते. सदर वाहनामध्ये व खाजगी वाहनामध्ये सापळा पथक व आरोपी यांना घेवुन पोलीस ठाणे वाशी येथे आलो तेथे योग्य ती पुढील कारवाई करण्यात आली.

तरी तानाजी त्रिबंक तांबे, पोकॉ/ 260 नेमणुक पोलीस ठाणे वाशी यांचे विरुध्द मी दिनांक 15.01.2024 रोजी दिलेल्या तक्रारी वरुन दिनांक 15.01.2024 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक 1. तानाजी तांबे, पोकॉ/260 नेमणुक पोलीस ठाणे वाशी यांनी माझे विरुध्द दाखल असलेल्या एन.सी.मध्ये बीट अंमलदार यांना प्लेन चॅप्टर रिपोर्ट पाठविण्यासाठी सांगितल्याचे बदल्यात व माझे बायकोला तक्रार मिटवुन घेण्यासाठी व पुन्हा तक्रार करु नको असे समजावुन सांगण्याचे कामासाठी श्री रणजित कासारे पोलीस यांचे मार्फतीने 2,000/- रुपये लाचेची मागणी केली. व सापळा कारवाई दरम्यान 2,000/- रुपये लाच रक्कम आज दिनांक 16.01.2024 रोजी 12.12 वाजताचे सुमारास पंचासमक्ष खाजगी इसम पवन हिंगमिरे, युनिक कलेक्शन यांनी त्यांचे दुकानात वाशी येथे श्री तानाजी तांबे यांचे सांगणेवरुन स्वत: स्विकारली आहे. तसेच श्री रणजित कासारे यांनी माझे वरील कामासाठी तानाजी तांबे यांचे सांगणेवरुन दि.15.01.2024 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 2000/- रुपये लाचेची मागणी केली. म्हणुन माझी 1. तानाजी त्रिबंक तांबे, वय 28 वर्ष, पोकॉ/ 260 नेमणुक पोलीस ठाणे वाशी मुळ रा. जेकटेवाडी ता. परंडा सध्या पोलीस ठाण्याच्या पाठीमागे, वाशी 2. रणजित अनिल कासारे, वय 31 वर्ष, पोकॉ/ 514 नेमणुक पोलीस ठाणे वाशी रा. चिचंपुर (बु) ता. परंडा सध्या रा. वाशी 3. पवन राजेंद्र हिंगमिरे, वय 26 वर्ष, व्यवसाय युनिक कलेक्शन वाशी रा. झिन्नर ता. वाशी जि. धाराशिव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे लॅपटॉवर टंकलिखीत करुन त्यांची प्रिंट काढून मला वाचण्यास दिली. ती मी वाचुन पाहिली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAJKUMAR NARAYAN SASANE
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

16.01.2024

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Shashikant Dattatra
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे,वाशी
जि.उस्मानाबाद



Scanned with CamScanner